# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः16.09.2024** **वारःसोमवार**

---

1. भारतीय राज्यघटनेबाबत नवीन पिढीमध्ये जागृतीसाठी संविधान मंदिर प्रेरणादायी ठरेल-उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचा विश्वास
2. संशोधन आणि तंत्रज्ञानाची जोड देत कृषी अर्थव्यवस्थेला पाठबळ द्यावं लागेल-केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन
3. पुण्यातील पहिल्या वंदे भारत रेल्वेसह राज्यातल्या तीन गाड्यांचं आज पंतप्रधानांच्या हस्ते दूरस्थ माध्यमातून लोकार्पण आणि
4. चौथ्या हॉकी इंडिया अजिंक्यपद स्पर्धेत पेट्रोलियम क्रिडा प्रोत्साहन मंडळ संघाला जेतेपद

**उपराष्ट्रपती**

भारतीय राज्यघटना ही सर्वार्थाने वैशिष्ट्यपूर्ण असून, भारतीय राज्यघटनेबाबत नवीन पिढीमध्ये जागृतीसाठी संविधान मंदिर नक्कीच प्रेरणादायी ठरेल, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी काल मुंबईत केल. राज्यातल्या 434 औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संविधान मंदिराचं लोकार्पण मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयातल्या कार्यक्रमात दूरस्थ पद्धतीनं केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी उपराष्ट्रपती यांच्या पत्नी डॉ. सुदेश धनखड, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, नागपूरातून दूरस्थ प्रणालीद्वारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदि उपस्थित होते. भारतीय संस्कृतीचे सार आपल्या संविधानात सामावले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीमध्ये खूप मोठे योगदान आहे. सामाजिक न्याय हा आरक्षणाचा आधार असून वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्यावर भर देणं गरजेचे आहे असं धनखड म्हणाले. डॉ. आंबेडकर यांचे योगदान नव्या पिढीला समजणे गरजेचे असून त्यादृष्टीने संविधान मंदिर उपक्रम अतिशय उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**गडकरी**

कृषी अर्थव्यवस्थेला अव्हेरून आत्मनिर्भर भारताचं स्वप्न पूर्ण होणार नाही, त्यामुळे आपल्याला संशोधन आणि तंत्रज्ञानाची जोड देत कृषी अर्थव्यवस्थेला पाठबळ द्यावंच लागेल; असं आग्रही मत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. भारतरत्न पुरस्कारानं सन्मानित सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त काल राष्ट्रीय अभियंता दिवस साजरा करण्यात आला यानिमित्त सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आणि सीओईपी माजी विद्यार्थी संघटनेच्यावतीने देण्यात येणाऱ्या 'सीओईपी अभिमान पुरस्कार' वितरण समारंभात ते बोलत होते. यंदाचा सीओईपी जीवनगौरव पुरस्कार अहमदाबादमधल्या भगवती स्फेरोकास्टचे अध्यक्ष आणि कार्यकारी संचालक ज्येष्ठ उद्योगपती पी.एन. भगवती यांना देण्यात आला. अभिनेता

वैभव तत्ववादी, राज्याच्या पर्यावरण विभागाचे मुख्य सचिव प्रवीण दराडे, सिक्कीमचे मंत्री राजू बसनेत, अमेरिकेतील 'जे.पी. मॉर्गन चेस'च्या कार्यकारी संचालक मोनिका पानपलिया आणि अमेरिकेतील टेस्ला मोटर्सचे वरिष्ठ संचालक हृषीकेश सागर यांना यावेळी यंदाच्या सीओईपी अभिमान पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. पुढील सहा महिन्यात मुंबई बंगळूरु या 14 पदरी महामार्गाचं काम सुरू होणार असल्याची घोषणा गडकरी यांनी केली. ते म्हणाले...

**<u>वंदेभारत-मोहोळ</u>**

पुण्यातून सुरू होणाऱ्या पहिल्या वंदे भारत एक्स्प्रेसचं लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरस्थ माध्यमातून होणार आहे. राज्यातील तीन वंदे भारत एक्स्प्रेसचं उद्घाटनदेखील आज होणार आहे; यात पुणे-हुबळी; कोल्हापूर-पुणे आणि नागपूर-सिकंदराबाद या तीन रेल्वे गाड्यांचा समावेश आहे. केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ पुण्यातून या 'वंदे भारत' रेल्वेला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. पुणे-हुबळी आणि कोल्हापूर-पुणे या दोन्ही गाड्या प्रत्येकी तीन दिवस धावणार आहेत.

**<u>धनगर</u>**

धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गाचं आरक्षण मिळावं यासाठी सकारात्मक पावलं उचलली जातील. ही सर्व प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत टिकणारी असावी आणि यात अन्य कुठल्याही समाजावर अन्याय होणार नाही, असे प्रयत्न केले जातील, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईत एका बैठकीत सांगितलं. धनगर समाजाला अनुसूचित जमातीचं आरक्षण मिळावं यासाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक झाली. मुख्यमंत्र्यांनी उपोषणकर्त्या आंदोलकांशी दुरध्वनीवरुन संपर्क साधला आणि त्यांची विचारपूस केली. धनगर समाजाला अनुसूचित जमातीचं आरक्षण लागू करण्याबाबत स्थापन करण्यात आलेल्या डॉक्टर सुधाकर शिंदे समितीलाही लवकरात लवकर अहवाल देण्याचे निर्देश या बैठकीत देण्यात आले. डॉक्टर शिंदे यांनी समितीच्या कामाबाबत माहिती दिली.

**<u>वाहतूक बदल</u>**

अनंत चतुर्दशीनिमित्त उद्या पुणे शहरातील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. शिवाजी रस्ता तसच लक्ष्मी, कुमठेकर, बाजीराव, केळकर, टिळक, शास्त्री, जंगली महाराज, कर्वे, भांडारकर, आणि फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार आहेत. तर शहरातील इतर रस्त्यावरील वाहतूक अन्य मार्गानं वळवण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांच्या वाहतूक विभागानं दिली आहे.

**<u>ईदसुट्टी</u>**

देशभरात आज साजऱ्या होणाऱ्या ईद मिलाद उन नबीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मुस्लीम समुदायाला शुभेच्छा दिल्या आहेत. प्रेषिद मोहम्मद पैगंबरांनी प्रत्येकाला प्रेम आणि बंधुत्वाच्या भावनांना बळ देण्यासाठी प्रेरित केलं. त्यांनी समाजात दया, मानवतेचा प्रसार केला असं सांगून राष्ट्रपतींनी मुस्लीम समुदायाला पवित्र कुराणातली शिकवण आत्मसात करण्याचं आवाहन केलं. दरम्यान, ईद मिलाद उन नबीची सार्वत्रिक सुट्टी मुंबई महानगर, उपनगर वगळता राज्यात सर्वत्र आज कायम ठेवण्यात आली आहे. मुंबई महानगर आणि उपनगरांमध्ये 18 सप्टेंबरला ही सुटी राहील.

**<u>शरद पवार-धुळे</u>**

धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा इथं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीनं शेतकरी मेळावा आणि वारकरी संप्रदायाच्या भजनी मंडळांना साहित्य वाटपाचा कार्यक्रम काल आयोजित करण्यात आला होता. शिंदखेडा तालुका हा शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांचा तालुका आहे मात्र इथं सध्या गुंडगिरी आणि दहशतीचं वातावरण असल्याचं दिसतं अशी टिका पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी यावेळी बोलताना केली.

**<u>उद्धव ठाकरे-अहमदनगर</u>**

आमचं सरकार आल्यानंतर जुनी पेन्शन योजना जशीच्या तशी लागू करू असं आश्वासन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी काल दिलं. शिर्डी इथ आयोजित जुनी पेन्शन योजनेच्या राज्य अधिवेशनात ते बोलत होते.

**<u>मतदार नोंदणी-अहमदनगर</u>**

अहमदनगर जिल्ह्यातील 120 महाविद्यालयात नवीन मतदारांची नोंदणी सुरू असून 18 वर्ष पूर्ण झालेल्या नवीन 50 हजार मतदारांची नोंदणी झाली असल्याची माहिती राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ.किरण कुलकर्णी यांनी दिली. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाच्यावतीने आयोजित 'लोकशाही चर्चा' या चर्चासत्रात ते बोलत होते.

**<u>दिलीप वळसे</u>**

केंद्राच्या सहकार विभागाने आणलेल्या नवीन कायद्यानुसार सहकारी संस्थांना 151 प्रकारचे विविध व्यवसाय करण्याला परवानगी दिली आहे. संस्थांच्या अध्यक्षांनी आणि संबंधितांनी या योजनांची माहिती घेऊन योजना राबवण्याचं आवाहन राज्याचे सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी काल केलं. ते काल पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील अवसरी इथल्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्यावतीने आयोजित सहकार परिषद आणि बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते.

**<u>राणे-सिंधुदुर्ग</u>**

बॅरिस्टर नाथ पै हे महान व्यक्तिमत्व आपल्या वेंगुर्ल्याच असून; याचा संपूर्ण देशाला अभिमान आहे, त्यांच स्मारक आचार विचारांचं आदान प्रदान करणारं केंद्र असायला हवं, अस मत खासदार नारायण राणे यांनी व्यक्त केलं. सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेंगुर्ले नगरपरिषदेतर्फे बॅरिस्टर नाथ पै फाउंडेशन फॉर कोकण डेव्हलपमेंट संस्थेच्या सहयोगातून उभारलेल्या बॅरिस्टर नाथ पै समुदाय केंद्राचा लोकार्पण सोहळा झाला त्यावेळी राणे बोलतं होते. यावेळी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर आदि उपस्थित होते.

**<u>अपघात-धुळे</u>**

धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यात दसवेल फाट्याजवळ  खासगी प्रवासी वाहन आणि कारमध्ये समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात पाच जण ठार तर चार जण जखमी झाले. मृतांमध्ये तीन महिलांचा समावेश आहे.

**<u>निधन-रत्नागिरी</u>**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या चिपळूण इथले मानद वन्यजीव रक्षक नीलेश बापट यांचं शनिवारी हृदयविकाराच्या झटक्यामुळे निधन झालं. ते 46 वर्षांचे होते. निसर्गरक्षणासाठी सतत कार्यरत असलेल्या बापट यांनी चिपळूणमधल्या एका डोंगरावर जैवविविधतेनं समृद्ध वनीकरण प्रकल्प साकारला होता. वाट चुकलेल्या वन्यप्राण्यांना त्यांच्या अधिवासात सोडण्यासाठीही ते प्रयत्नशील असत. पुण्यातल्या निसर्गसेवक संस्थेनं निसर्गसेवक पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला होता.

**<u>हॉकी</u>**

पुण्यात झालेल्या वरिष्ठ पुरुष गटाच्या चौथ्या हॉकी इंडिया आंतरविभागीय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत पेट्रोलियम क्रिडा प्रोत्साहन मंडळानं सलग दुसऱ्यांदा विजेतेपदावर आपलं नाव कोरलं. गेल्यावेळी उपविजेता ठरलेल्या रेल्वे क्रिडा प्रोत्साहन मंडळ संघाचा पेट्रोलियम संघानं पेनल्टी शूटआउटवर 3-2 असा पराभव केला. विजेत्या संघाकडून सुमीतकुमार, शिलानंद लाक्रा तसंच कर्णधार देविंदर वाल्मिकीने गोल केले. तत्पूर्वी तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत सेवा क्रीडा नियामक मंडळ संघानं भारतीय अन्न महामंडळ संघाचा पराभव करत तिसरं स्थान राखलं. महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे सरचिटणीस नामदेव शिरगावकर यांच्या हस्ते बक्षीस वितरण झालं.

**<u>हवामान</u>**

राज्यात आज सर्वच विभागांमध्ये तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.